पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : १७ •फेब्रुवारी, २००९ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## गुणवंत कामगार पुरस्कार

सन २००९ मधील गुणवंत कामगार पुरस्काराचे अर्ज सल्लागार (कामगार) कार्यालयात मार्च, २००९ च्या पहिल्या आठवड्यापासून उपलब्ध आहेत. जास्तीत जास्त सभासदांनी सहभागी व्हावे.

## श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या खेळाडू पंचकन्या

पुणे मनपा सेवेतील खेळाडू श्री. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या पंचकन्यांची ओळख :



**१. सौ. संगिता गोरखनाथ सोनवणे :** इयत्ता ८ वी पासून शिवप्रताप संघाकडून कबड्डी खेळणाऱ्या, मॉडर्न महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असताना ज्यांनी आंतरविदयापीठ कबड्डी स्पर्धेत आपल्या संघास तीन वेळा अजिंक्यपद मिळवून दिले, अशा मुख्य लेखापाल कार्यालयाकडील सेविका सौ. संगिता गोरखनाथ सोनवणे यांना १९९१-९२ मध्ये शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच, वरिष्ठ महाराष्ट्र संघाकडून प्रतिनिधीत्व करताना सौ. सोनवणे यांनी अनेक सामन्यांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावली आहे. खेळाबरोबरच त्यांनी पदवीही प्राप्त केली.



**२. सौ.स्वाती रामचंद्र परांजपे :** कर आकारणी कर संकलन कार्यालयात कार्यरत असलेल्या सौ. स्वाती रामचंद्र परांजपे यांना खो खो या क्रीडा प्रकारात १९८८-८९ मध्ये शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त झाला. एमकॉमपर्यंत शिक्षण घेतलेल्या सौ.परांजपे यांनी आंतरविद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर अनेक ॲथलेटिक्स व खो खो स्पर्धांमध्ये भाग घेवून अजिंक्यपदासह सुवर्णपदके मिळविली आहेत. अहिल्यादेवी प्रशाळेत प्राथमिक शिक्षणापासून खो खो या खेळाची आवड असल्याने अहिल्यायन्स क्लबकडून खेळताना त्यांनी अनेक सामन्यांमध्ये संघाचे नेतृत्व केले आहे.



**३. सौ.सुषमा प्रदीप इप्ते :** जिमखाना विभागात शिपाई हुद्यावर कार्यरत असलेल्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळे १९७३ पासून ज्युदो या खेळातील दैदिप्यमान कामगिरीबद्दल आयातकर विभागाकडील सौ. इप्ते यांना १९८९ साली शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाला. ज्युदोबरोबरच सौ. इप्ते यांनी राज्य पातळीवर कबड्डी व फुटबॉल स्पर्धेमध्येही प्रतिनिधीत्व केले आहे. सौ. इप्ते यांनी खुल्या गटात खेळून अनेक सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके मिळविली आहेत. सौ. इप्ते यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अहिल्यादेवी हायस्कुल आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन महाविद्यालयामधून पूर्ण केले आहे.



**४. कु. वृषाली विष्णु गायकवाड :** दररोज सुमारे १०० व आठवड्यातून एकदा सुमारे १५० कि.मी. सायकलिंग करुन या क्रीडा प्रकारात केलेल्या अद्वितीय कामगिरीमुळे सुरक्षा विभागाकडील ज्यु.ग्रे.लेखनिक कु.गायकवाड यांना २००५-०६ मध्ये शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हैद्राबाद, पुणे, आसाम, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश येथे झालेल्या विविध स्पर्धांमध्ये गायकवाड यांनी १३ सुवर्ण, १६ रौप्य व ९ कांस्य, पदके मिळविली आहेत. सन २००७ मध्ये घेतलेल्या परीक्षेमध्ये महाराष्ट्रातून पहिली महिला राष्ट्रीय पंच होण्याचा मान कु. गायकवाड यांनी मिळविला आहे.



**५. सौ. मिनाक्षी महेंद्र ठाकुर :** सन १९८७ मध्ये झालेल्या पहिल्या सायकल स्पर्धेत मामाने दिलेल्या सायकलसह सहभागी होवून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या व कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयात ज्यु.ग्रे.लेखनिक या पदावर कार्यरत असलेल्या सौ.ठाकुर यांना सन १९८९-९० मधील सायकलिंगसाठीचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देवून गौरविण्यात आले. तेंव्हापासून विविध व राष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग स्पर्धेत भाग घेवून विजेतेपदासह अनेक पदके पटकाविली आहेत.

शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या सेविकांचे कल्याण निधीमार्फत अभिनंदन

## कामगार कल्याण निधीची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न
## गुणवंत कामगार पुरस्कार रु. २५,०००

पुणे मनपा कामगार कल्याण निधीची सन २००७-०८ ची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि. ५/२/०९ रोजी सकाळी ११.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मंगळवार पेठ येथे निधीचे कार्यकारी अध्यक्ष तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त मा. एम.एस.देवणीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



सभेच्या सुरुवातीस निधीचे सचिव तथा सल्लागार (कामगार) मा. नंदकिशोर जगताप यांनी निधीच्या सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील उल्लेखनीय कामगिरीचा संक्षिप्त आढावा घेतला. यामध्ये ९६ मृत सेवकांच्या वारसांना १४.४० लाख वारस अनुदान वितरित केले, १३ गुणवंत कामगार पुरस्कार व मा. सुरेंद्र मुदलियार यांच्या देणगीतून कार्यप्रेरणा पुरस्कार प्रदान केले. विविध क्रीडा, निबंध लेखन स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, १० वी/१२वी मधील गुणवंत पाल्यांचा सत्कार, इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचा मा. सचिव यांनी आवर्जून उल्लेख केला. याशिवाय कामगार कल्याण निधीतून देण्यात येणाऱ्या रु. १५,०००/- वारस अनुदानाबरोबरच महापालिका निधीतून रु. ३५,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याची बाब नमूद केली. तसेच, निधीची आतापर्यंतची वाटचाल दैदिप्यमान असून, सर्वांच्या सहकार्याने निधी भविष्यात उज्वल कामगिरी पार पाडू शकेल, अशी आशा मा. सचिव यांनी व्यक्त केली.

त्यानंतर दिनांक १२/१/२००९ रोजी पाठविलेल्या कार्यपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. त्यामध्ये दि.२२/२/०८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे, २००७-०८ मधील कार्यकारी समितीने शिफारस केलेले वार्षिक हिशेब व अहवालास मंजुरी देणे, सनदी लेखापरीक्षकाकडून प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे, कार्यकारी समितीने शिफारस केलेल्या सन २००९-१० चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे, इत्यादी विषयांचा समावेश होता. या सर्व विषयांवर वार्षिक सर्वसाधारण सभेत साधकबाधक चर्चा होवून त्यास एकमताने मंजुरी देण्यात आली.

त्यानंतर सभासदांकडून आलेल्या लेखी व ऐन वेळच्या सूचनांवर सभेत विचारविनिमय करण्यात आला. निधीची आर्थिक क्षमता विचारात घेता रु. ५ लाख कर्ज देण्याची मागणी अवास्तव असल्याने ती अमान्य होवून सदर रु. २५,०००/- ची मर्यादा रु. ५०,०००/- पर्यंत वाढविणेचा तसेच, फक्त पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा निकष बदलून १२ वी नंतर तांत्रिक शाखेतील पदवीसाठी आणि इतर शाखांबाबत पदव्युत्तर शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती देण्याचाही निर्णय घेण्यात आला. या निर्णयासह उपयुक्त आणि मार्गदर्शक सूचना मा. महापालिका आयुक्त यांचे निदर्शनास आणून देण्यात येईल, त्यानंतर अंमलबजावणीची कार्यवाही करणेत येईल, असे मा. सचिव यांनी स्पष्ट केले.

त्यानंतर वार्षिक सर्वसाधारण सभेस कार्यकारिणी सदस्या मा. मुक्ता मनोहर यांनी मार्गदर्शन केले. या मार्गदर्शनामध्ये त्यांनी कार्यकारिणीच्या सभेमध्ये झालेल्या भरीव आणि स्वागतार्ह निर्णयांचा आढावा घेतला. तसेच सभासदांनी उपस्थित केलेल्या अनेक मुद्यांचा आढावा घेताना कामगार कल्याण निधीच्या कार्यकारी समितीवर करण्यात येणाऱ्या नियुक्त्या विहित नियमानुसार करण्यात येत आहेत. यामुळे ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शी असून सर्व निर्णय एकमताने घेण्यात येत आहेत. तसेच, गुणवंत कामगार पुरस्काराशिवाय विशेष पुरस्कार व प्रोत्साहन योजना राबविण्याच कार्यकारिणीने घेतलेल्या निर्णयाचे त्यांनी कौतुक केले.

सभेच्या शेवटी मा. अध्यक्ष यांनी सभेमधील कामकाज आणि निर्णयांचा संक्षिप्त आढावा घेतला. त्यामध्ये आधुनिक काळामध्ये कामगारांनी कामगारांसाठी स्वतंत्र निधी तयार करुन त्यामधून स्वविकास साधणे ही संकल्पना अतिशय स्वागतार्ह व गरजेची आहे. तथापि, या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजना सर्वसामान्य सेवकांपर्यंत पोचणेसाठी कार्यकारिणी सदस्यांनी अधिक कार्यरत होण्याची गरज मा. अध्यक्ष यांनी प्रतिपादन केली. कामगार कल्याण निधी हे नव्याने लावलेले रोपटे असून त्यास पाणी कुणी घालून मोठे करावे या वादात न पडता सर्वांनी सक्रीय सहभाग घेवून त्या रोपट्याला मोठे करावे असे आवाहन त्यांनी केले. कामगार कल्याण निधीतून देण्यात येणारी शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्तीची रक्कम रु. २५,०००/-हून ५०,०००/- करणे, गुणवंत कामगार पुरस्काराची रक्कम रु. ११,१११/- हून २५,०००/- करणे, महिलांचा वाढता प्रतिसाद, इत्यादी स्पृहणीय बाबींची त्यांनी प्रशंसा केली. कामगार कल्याण निधीतून विविध उपक्रम राबविताना कामगार हा घटक केंद्रीभूत मानून करण्यात आलेल्या कार्यवाहीचे श्रेय मा. सल्लागार (कामगार) व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना असल्याचे त्यांनी आवर्जुन या प्रसंगी नमूद केले.

शेवटी उपस्थित सभासद, कार्यकारिणी सदस्य, इत्यादींना अल्पोपहार देवून आणि सर्वांचे आभार मानून वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

## संपादकीय...

# मन आरोग्य आणि व्यायाम

Health is Wealth जीवनात शारिरीक आरोग्याला किती महत्व आहे हे लहानपणापासून घरात, शाळेत, महाविद्यालयात प्रत्येकजण शिकत असतो. दूरदर्शन, आकाशवाणी, वाचन, इत्यादीमार्फत आरोग्याबाबत सातत्याने ज्ञान व उजळणी होत असते. आरोग्य संपन्नता टिकविणेसाठी पूरक व सकस आहार, नियमित आवश्यक व्यायाम आणि विश्रांती यांची गरज असते.

सध्याच्या तीव्र स्पर्धेच्या युगामध्ये प्रत्येकाची जीवनशैली ताणतणावयुक्त असते. ही जीवनशैली व्यक्तिगत पातळीवर कोणीच बदलू शकत नाही. बदलत्या जीवनशैलीवर मात करणे किंवा आहे तशी स्विकारणे असे दोन पर्याय व्यक्तीसमोर उभे रहातात. सर्वसाधारणपणे जीवनशैलीशी मुकाबला करण्याचा मार्ग निवडणे अशी व्यक्तिची इच्छा असते. तथापि, बदलत्या जीवनशैलीशी मुकाबला करताना फक्त मानसिक मुकाबला न करता शरीर, मन आणि आरोग्य ज्या वेळेस एकत्र येते त्या वेळेस अशा जीवनशैलीमध्ये बदल करणे सहज शक्य होते.

वाढती स्पर्धा, अयोग्य जीवनशैली, ताणतणाव आणि अयोग्य आहार, इत्यादीमुळे आधुनिक युगात रक्तदाब, पाठदुखी, मानदुखी, ह्दयरोग, मधुमेह, सांधेदुखी, लठ्ठपणा, इत्यादी शारीरीक व्याधींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. या सर्व व्याधींवर मात करणेसाठी नियमितपणे व्यायाम व त्यामुळे साधणारे मानसिक आणि शारिरीक स्वास्थ्य प्राप्त करणेसाठी प्रत्येकाने विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रयत्नामध्ये साधनेयुक्त व साधनांशिवाय व्यायाम यामध्ये अनुक्रमे मल्लखांब, डमबेल्स आणि सूर्यनमस्कार, जोर बैठका, धावणे, चालणे, इत्यादी व्यायाम प्रकारांचा समावेश होतो. तसेच, व्यायाम हा वैयक्तिक किंवा सांघिक स्वरुपाचाही असू शकतो.

सर्वसाधारणपणे मनाचा आरोग्यावर आणि आरोग्याचा मनावर निश्चितपणे परिणाम होत असतो. यासाठी शरीर व मन स्वस्थ असणे ही यशस्वी जीवन व आरोग्याची गुरुकिल्ली आहे. कारण मन म्हणजे संगणक किंवा गणकयंत्र आहे. मनाची व चित्ताची सातत्याने नवीन मागणी व्यक्तिकडे येत असते. प्रत्येक क्षणी व्यक्तिच्या मनात नवनवीन विचार येत असतात. हे विचार सकारात्मक व नकारात्मक असतात. या सर्वांचा आपल्या शरीरावर कळत नकळत मोठ्या प्रमाणावर अनुकुल व प्रतिकुल परिणाम होत असतात. या सर्वांवर मात करणेसाठी शारिरीक आणि मानसिक स्वास्थ्य टिकविणे हे हल्लीच्या काळातील एक आव्हान आहे. हे आव्हान समर्थपणे पेलण्यासाठी प्रत्येकाने नियमितपणे व्यायामासाठी वेळ देणे आवश्यक आहे. तथापि, कोणत्याही प्रकारचा व्यायाम करायला सुरुवात करण्यापूर्वी आपली शरीर प्रकृती, असणारे विकार आणि आवश्यकता यांचा नीट विचार करुन तज्ञांच्या सल्याने व्यायाम प्रकार निवडणे आवश्यक आहे. अन्यथा अशा व्यायामाचा लाभ होणेऐवजी त्रासच अधिक होण्याचा धोका नाकारता येत नाही.

मनुष्याच्या मनातील विचारांचे चार प्रकारात वर्गिकरण करता येते. १. पंचेंद्रीयांकडून येणाऱ्या सर्व माहितीचे संकलन करणे, २. अशी संकलन केलेली माहिती साठवून ती स्मृती केंद्राकडे पाठविणे, ३. कोणत्या वेळी कसे वागावे ते ठरविणे, ही वेदना प्रकट होणे आणि ४. निर्णयानुसार प्रत्यक्ष कृती करणे म्हणजे प्रतिक्रिया होय. या विचारांना शक्तीमध्ये रुपांतरीत करण्यासाठी व शरीरावरील त्यांचे प्रतिकुल परिणाम टाळण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज आहे.

प्रत्येकाने आपापली शरीर प्रकृती आणि आवश्यकता विचारात घेवून व्यायामाची निवड करणे आवश्यक आहे. व्यायामामुळे शरीरामधील उत्साह आणि कार्यक्षमता वाढीस लागते. याशिवाय संपूर्ण अवयवांना योग्य प्रमाणात रक्त पुरवठा होवून निर्माण झालेल्या उर्जेद्वारे तो दैनंदिन कामकाज कार्यक्षमरितीने पार पाडू शकतो. हल्लीच्या माहिती तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगामध्ये खाजगी संस्थांमध्ये मनुष्यबळ विकास कक्षामार्फत कार्यालयीन वेळेत सक्तीचे व्यायाम करुन घेतले जातात. परिणामी कार्यालयीन कामकाजामध्ये उपयुक्तता, कार्यक्षमता, गतिमानता निश्चितपणे येते हे सिध्द झाले आहे.

शारिरीक व्यायामाबरोबरच मानसिक कणखरपणा येणेसाठी ऋषीमुनींनी अष्टांगयोग प्रस्तावित केले आहेत. तसेच, पतंजली मुनींनी त्यांच्या पतंजली योगसूत्रात चार भाग आणि १९५ सूत्रांमध्ये संपूर्ण योग विषद केला आहे. त्याचप्रमाणे स्वामी रामदेवजी महाराज यांनी शारिरीक आणि मानसिक कणखरतेसाठी अतिशय सोपी पध्दत विषद केली आहे. त्यामध्ये सात सूक्ष्म व्यायाम, सात प्राणायम प्रकार आणि सात आसने अशा अतिशय साध्या पध्दतीने दररोज एक ते दिड तास व्यायाम केल्यास व्यक्तिस आरोग्य संपन्नता निश्चितपणे प्राप्त होते. याचाच एक भाग म्हणून महापालिकेतर्फे क्षेत्रीय कार्यालयामधून आरोग्य, योग आणि प्राणायम शिबीरे घेण्यात आली असून भविष्यातही ही शिबीरे मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्याचा मनोदय आहे.

# परिचय कार्यकर्ता/अधिकारी/सेवकांचा

## श्री. सदाशिव डांगे

या अंकात आपण आपले नियमित कर्तव्य बजावत असताना सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून विविध समाजोपयोगी उपक्रमांमध्ये हिरीरीने भाग घेणारे पुणे महानगरपालिकेच्या संत नामदेव माध्यमिक विद्यालयाचे शालाप्रमुख श्री. सदाशिव डांगे यांचा परिचय करुन घेणार आहोत.

विविध आश्रमशाळा, वसतिगृहे, प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालयांमध्ये अध्यापनाचे काम केलेल्या श्री. डांगे सरांना शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आहे. श्री. डांगे सरांनी सोलापूर जिल्ह्यातील झरेवाडी, ता. सांगोला येथे चौथीपर्यंतचे व त्यानंतर सांगोला विद्यामंदीर, सांगोला येथे जुन्या अकरावीपर्यंतचे माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर अध्यापक विद्यालय, बार्शी येथे प्राथमिक शिक्षकांसाठी आवश्यक असणारा डी.एड हा अभ्यासक्रम पूर्ण केला.



डी.एड.अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर त्यांना व्हन्तुर येथील भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या आश्रमशाळेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. एक वर्षाच्या आश्रमशाळेतील सेवेनंतर बाबुजी जगजीवनराम विद्यार्थी वसतिगृह येथे काही महिने काम केल्यानंतर पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या येरवडा येथील शाळा क्र. ३ येथे सन १९७९ ते १९८३ अखेर प्राथमिक शिक्षक या पदावर काम पाहिले. प्राथमिक शिक्षक या पदावर काम करीत असतानाच सरांनी शिवाजी विद्यापीठाचा बी.ए. हा बहिस्थ अभ्यासक्रम पूर्ण केला. सन १९८३ पासून सरांनी बाबुराव सणस हायस्कुल, मंगळवार पेठ येथे माध्यमिक शिक्षक या पदाचे काम पहाण्यास सुरुवात केली व सन १९८४ मध्ये अरण्येश्वर अध्यापक विद्यालय येथून बी.एड. हा अभ्यासक्रम पूर्ण केला. सन १९९९ ते २००१ अखेर माध्यमिक शाळेवर काम केल्यानंतर सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, भवानीपेठ येथे शालाप्रमुख या पदावर पदोन्नती मिळाली. सध्या ते संत नामदेव विद्यालय येथे शालाप्रमुख या पदावर कार्यरत आहेत.

**संवादक : शिवाजी दौंडकर**
**कामगार कल्याणाधिकारी**

श्री. डांगे सर विविध संस्थांमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये हिरीरीने भाग घेतात. जेष्ठ उद्योगपती कै. शंतनुराव किर्लोस्कर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या किर्लोस्कर फौंडेशन या संस्थेमार्फत सन २००३-०४ साली आयोजित केलेल्या स्वच्छ व सुंदर शाळा स्पर्धेत संत नामदेव शाळेला सरांच्या अथक प्रयत्नाने प्रथम क्रमांक मिळाला. त्या वर्षी पुणे शहरातील एकूण १०० खाजगी व मनपाच्या शाळांनी स्पर्धेत भाग घेतला होता. सदर बक्षिस मिळाल्याने नागरिकांच्या महापालिकेच्या शाळेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनामध्ये फरक पडला, असे ते आवर्जून नमूद करतात. शाळेत कडक शिस्त व स्वच्छता राखून सुशोभिकरणातही त्यांचा मोलाचा सहभाग असतो.

शाळेतील १० वी/१२ वी च्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहतात. याबद्दल त्यांचा विविध संस्थांनी गौरवपत्र देवून सन्मान केलेला आहे. शालेय व्यवस्थापन या विषयातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पदविका धारण करणाऱ्या काही मोजक्या शालाप्रमुखांपैकी श्री. डांगे सर एक आहेत. दर वर्षी आळंदीहून निघणाऱ्या दिंडीमधील वारकऱ्यांची मुक्कामाची सोय प्रशालेत करतात. तसेच, विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण होण्याच्या उद्देशाने विद्यार्थी दिंडीचे आयोजनही ते करतात. LUMBA या दिल्ली येथील ट्रस्टमार्फत गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यामध्ये ते पुढाकार घेतात. शिक्षण क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे सरांचा विविध संस्थांनी उदा. Lions Club, नारायण फौंडेशन, जिल्हा परिषद यांनी वेळोवेळी सत्कार केलेला आहे.

मुलींच्या शिक्षणाबाबत आग्रही राहून ते गरीब पालकांचे प्रबोधनही करतात. त्यांच्या जन्मगावी थोर समाजसेवक सानेगुरुजी यांचा त्यांच्या स्वखर्चातून अर्ध पुतळा बसवण्याबद्दल सध्या ते प्रयत्नशील आहेत. गरीब व गरजू विद्यार्थ्यांना यथाशक्ती मदत करणाऱ्या, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी सतत प्रयत्नशील रहाणाऱ्या श्री. डांगे सरांना त्यांच्या कार्यात यश मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## सौ. लीला परदेशी



लहाणपणीच वडिलांच्या छत्रास पोरक्या झालेल्या, आईचे आशीर्वाद व मार्गदर्शनामुळे कोणत्याही संकटास न घाबरता बी.कॉम.आणि एल.एल.बी. शिक्षण पूर्ण केलेल्या, सामाजिक कार्याची आवड असणाऱ्या ज्यु.ग्रे.लेखनिक सौ.लीला प्रकाशसिंह परदेशी या गेल्या ९ वर्षांपासून महापालिकेत कार्यरत आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच विविध स्पर्धांमधील भाग, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे सदस्य व महिला प्रतिनिधी या पदांवर काम केल्याने नेतृत्वगुणांना विशेष वाव मिळाल्याचे त्या आवर्जून नमुद करतात.

सामाजिक काम करताना महिलांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करणे, त्याद्वारे महिलांना बचत व रोजगार संधी उपलब्ध करुन देणे, इ. कामे त्यांनी मोठ्या धडाडीने केलेली आहेत. कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित विविध क्रीडांमध्ये महिलांचा उत्स्फूर्त सहभाग मिळविणेकामी त्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

## सौ.तनुजा रावळ



कामगार शिक्षक म्हणून प्रशिक्षण घेतलेल्या व अंगणवाडी सेविकांच्या सहकार्याने झोपडपट्टीमध्ये विशेष कार्य करणाऱ्या सौ.तनुजा रावळ सध्या गाडीखान्यामध्ये ऑक्झिलरी नर्स म्हणून कार्यरत आहेत. नर्सिंग कौंसिलचा दोन वर्षांचा कोर्स उत्तीर्ण करुन महापालिका सेवेत रुजू झालेल्या सौ. रावळ यांनी किशोरवयीन मुली व लहाण मुलांसाठी लसीकरण, रक्तदान, इत्यादी सामाजिक कामे केली आहेत. तसेच, कामगार कल्याण निधीच्या सक्रीय कार्यकर्त्या आणि कामगार शिक्षक म्हणून विशेष कामगिरी बजावत आहेत.

# पुणे महापालिकेचा ५९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा



पुणे मनपा चा ५९ वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमांद्वारे उत्साहाने साजरा करण्यात आला. दि.१३/२/०९ रोजी ४ वाजता श्री.छत्रपती शिवाजी सभागृहात उलटापुलटा सभा आयोजित केली होती. सभेमध्ये महापालिका अधिकाऱ्यांनी सदस्यांच्या तर सदस्यांनी अधिकाऱ्यांच्या भूमिका वठविल्या. मा. एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी महापौरपद, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष स्थायी समिती यांनी मा. महापालिका आयुक्त तर नगर सचिव म्हणून मा. आबा बागुल, विरोधी पक्ष नेता यांनी कामकाज पार पाडले. या सभेमध्ये महापालिका अधिकारी यांनी विविध प्रस्ताव आणि प्रश्नांद्वारे रंगत आणली.

दिनांक १४/२/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता उद्यान विभागामार्फत संभाजी उद्यान येथे फळे फुले भाजीपाल्याचे भव्य प्रदर्शन वेगवेगळ्या १२ विभागात भरविण्यात आले होते. त्यामध्ये ५८ उप तर २६६ पोट विभाग करण्यात आले होते. त्यामध्ये शोभिवंत पानाफुलांच्या कुंड्यां, औषधी वनस्पतींचा संग्रह, गुलाब पुष्प, हंगामी फुले, निर्यातक्षम फुलांची रचना, टेबल, भाजीपाला आणि सॅलड सजावट, इत्यादी प्रकार प्रदर्शनात मांडण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन मा. सौ राजलक्ष्मी भोसले महापौर, पुणे व मा.प्रवीणसिंह परदेशी, महापालिका आयुक्त यांचे हस्ते झाले.

प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १५/२/२००९ रोजी बालगंधर्व रंगमंदीर येथे पार पडला. या प्रसंगी मा. प्रभाकर देशमुख, कृषी आयुक्त हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये बोलताना, पुणे शहरातील घरे, निवासी वसाहती, मोकळ्या जागा, हद्दीबाहेरील मोकळ्या जागांवर शक्य तेवढ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे, कृषी विभागाच्या वतीने आवश्यक ते सर्व सहकार्य महापालिकेस दिले जाईल, असे आश्वासन मा. देशमुख यांनी दिले. तसेच, प्रदर्शनातील वैविध्यपूर्ण कलाकृती, फळे फुलांच्या रचना अतिशय आकर्षक व लक्षवेधक असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. या प्रसंगी विजय पोकरणा, कर्नल रवि चंद्रन, एन.डी.गाडगिळकर, चंद्रसेन बोराडे, हाजी शेख, डॉ. सुनिता मोरे, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. यशवंत खैरे, मुख्य उद्यान अधिक्षक यांनी केले.

दिनांक १४/२/२००९ रोजी बालगंधर्व रंगमंदीर येथील कलादालनात छायाचित्र व रांगोळीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यामध्ये श्री. सुरेश परदेशी यांची छायाचित्रे, सौ. अरुणा जाधव यांची पेंटींग्ज आणि श्री. जगदिश चव्हाण व सौ. गीता आचार्य यांनी काढलेल्या रांगोळ्या अतिशय आकर्षक होत्या. तसेच, दुपारी महापालिका अधिकारी आणि सेवकांचा सहभाग असलेले मोरुची मावशी हे नाटक सादर करण्यात आले. महापालिका सेवकांनी केलेल्या उत्कट अभिनयास उपस्थित प्रेक्षकांनी भरभरुन दाद दिली. त्याच दिवशी संध्याकाळी पुणे महानगरपालिका सांस्कृतिक मंचातर्फे वरील कार्यक्रमाबरोबरच हिंदी, मराठी सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास महापालिका अधिकारी/सेवक व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, दुपारी महापालिका अधिकारी/सेवकांच्या पाल्यांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करणेसाठी सल्लागार (कामगार) कार्यालय व पुणे मनपा सांस्कृतिक कलामंच यांनी विशेष परिश्रम घेतले.

दिनांक १५/२/२००९ रोजी महापालिकेच्या वर्धापन दिनी सकाळी ७.०० वाजता महापालिका भवन - जंगली महाराज रस्ता - टिळक रस्ता - अभिनव चौक ते पं.नेहरु स्टेडियम या मार्गाने अर्धमॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये महापालिका अधिकारी, सेवक व पुणेकर नागरिक सहभागी झाले होते. या स्पर्धेस मनपा भवन येथून मा. महापौर यांनी झेंडा दाखवून सुरुवात केली. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ पं. नेहरु स्टेडियम येथे सकाळी ९.०० वाजता पार पडला. पुरुष व महिला गटामधून प्रथम क्रमांक विजेत्या स्पर्धकास प्रत्येकी रक्कम रु. ५,०००/- पारितोषिक रक्कम देवून गौरविण्यात आले. तसेच, द्वितीय क्रमांक विजेत्यास रक्कम रु. ३,०००/- तृतीय क्रमांक विजेत्यास रु. १,०००/- व उत्तेजनार्थ दोन स्पर्धकांना रक्कम रु. १,०००/- मा. महापौर, पुणे व मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे हस्ते देण्यात आले.

दिनांक १५/२/२००९ रोजी आयुक्त, महापौर संघ आणि वृत्तपत्र प्रतिनिधी आणि छायाचित्रकार संघांदरम्यान १२ षटकांचे क्रिकेटचे सामने खेळविण्यात आले. छायाचित्रकार व आयुक्त संघात झालेल्या साखळी सामन्यामध्ये आयुक्त संघाने छायाचित्रकार संघावर ३० धावांनी विजय मिळविला. महापौर संघ विरुध्द पत्रकार संघ या सामन्यात महापौर संघाने ८ गडी राखून विजय मिळविला. दोन्ही विजेते आयुक्त व महापौर संघातील अंतिम सामन्यात आयुक्त संघाने महापौर संघाचा पराभव करुन अजिंक्यपद मिळविले. आयुक्त संघाने या स्पर्धेमध्ये सलग दुसऱ्यांदा विजेतेपद संपादन केले. या अंतिम सामन्यामध्ये वरिष्ठ महापालिका अधिकारी आणि सभासद सहभागी झाले होते.

दि.१६/२/०९ रोजी सकाळी १० ते २ या कालावधीत मनपा हिरवळीवर महापालिका व आचार्य आनंद ऋषी ब्लड बँक यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन मा. महापौर यांचे शुभ हस्ते करण्यात आले. या प्रसंगी आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह अनेक नगरसेवक उपस्थित होते. याशिवाय बालगंधर्व रंगमंदीर येथे दि.१३/२/०९ रोजी युवक बिरादारी आणि दि.१५/२/०९ रोजी राहुल देशपांडे यांचे मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. आरोग्य विभागामार्फत मनपा रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.

# क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ

कल्याण निधीमार्फत दि.१२ ते १९ जानेवारी,०९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ दि. ५/२/०९ रोजी दु.१ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे मा. एम.एस.देवणीकर, अति. महा. आयुक्त (ज) तथा कार्यकारी अध्यक्ष यांचे नेतृत्वाखाली संपन्न झाला. या समारंभास अध्यक्ष मा.सुधाकर खासगीवाले, जेष्ठ चित्रकार तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.प्रल्हाद सावंत व मा. बाळासाहेब लांडगे उपस्थित होते. मा.लक्ष्मीकांत कोंढरे, उपायुक्त (ज), मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) तथा सचिव, मा.मुक्ता मनोहर, सदस्य तथा सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन, मा. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम व मा. लीलाधर वाबळे, माजी कार्यकारी संपादक, कल्याणवार्ता उपस्थित होते.



उपस्थित सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देवून सचिव यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात सभासद सेवकांमधील सुप्त कला गुणांना वाव देणे, परस्परांमध्ये सहकार्य व सामंजस्याची भावना वाढीस लागून कामातील कार्यक्षमता वाढणेकामी निधीमार्फत हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये सुरुवातीस महिलांचा अत्यल्प प्रतिसाद मिळत होता. या वर्षी समन्वयकांच्या उत्स्फूर्त परिश्रमामुळे महिलांचा सहभाग वाढल्याचे सिध्द झाले आहे. ही कौतुकास्पद बाब असल्याचे मा.सचिव यांनी मान्य केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. सुधाकर खासगीवाले यांनी मार्गदर्शन करताना रांगोळी स्पर्धेचे परीक्षण करताना निदर्शनास आलेल्या वैशिष्टयपूर्ण बाबी नमूद केल्या. मनपा तील महिला सेविका आपल्या निसर्गदत्त, कौटुंबिक आणि कार्यालयीन दैनंदिन जबाबदाऱ्या उत्तम प्रकारे पार पाडून आपले छंद जोपासून इतक्या सुरेख कलाकृती सादर करतात, याचे कौतुक करावे तेवढे थोडे असल्याचे त्यांनी नमूद केले. मा.खासगीवाले यांनी रांगोळी स्पर्धेतील सर्व स्पर्धकांना त्यांची स्वत:ची रांगोळी पुस्तके बक्षिस देवून यापुढे पारंपारिक ठिबक्यांच्या रांगोळीची कलाकृती सादर करावी असे आग्रहाने नमूद केले. महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष व कुस्ती क्षेत्रातील योगदानाबद्दल शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते मा.बाळासाहेब लांडगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना वयामध्ये सुध्दा मनपा अधिकारी/सेवक क्रीडा स्पर्धांत भाग घेवून आपले कसब पणाला लावत आहेत, ही वाखाणण्याजोगी बाब आहे. मनपा अधिकारी/सेवकांनी अधिकाधिक संख्येने या उपक्रमात सहभागी होवून खेळाचा प्रचार व प्रसार सर्व स्तरावर करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. तदनंतर महाराष्ट्र हौशी ॲथलेटिक संघटना व महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे सचिव मा.प्रल्हाद सावंत यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. क्रीडा स्पर्धांमधील महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी अनेकविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्याची आवश्यकता आहे. यापुढे मनपाला अशा क्रीडा प्रकारांमध्ये सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

कामगार कल्याण निधीमार्फत एकूण १८ क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये वैयक्तिक स्पर्धा क्रीडा प्रकारांमध्ये तृतीय क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकांना पदक देवून द्वितीय आणि प्रथम क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकांना स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्र देवून त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. क्रिकेट, व्हॉलिबॉल व कबड्डी या सांघिक स्पर्धेत अजिंक्यपद मिळविलेल्या तिन्ही संघांना फिरते चषक प्रदान करण्यात आले.

स्पर्धांच्या आयोजनासाठी सर्व समन्वयक विशेषत: महिला स्वयंसेविकांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे क्रीडा स्पर्धामध्ये महिलांचा सहभाग वाढून स्पर्धा यशस्वी झाल्या. सबब सर्व समन्वयकांचे गुलाबपुष्प देवून आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शिवाजी दौंडकर व आभार प्रदर्शन श्री. अरुण खिलारी, कामगार कल्याणाधिकारी यांनी केले.

## नवनियुक्त कार्यकारिणी

पुणे मनपा कामगार कल्याण निधीतून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी निधीतील नियम क्र.५ नुसार कार्यकारिणी ३ वर्षांसाठी नियुक्त करण्यात येते. कार्यकारिणीत मा.महापालिका आयुक्त, मा.अति. महापालिका आयुक्त (ज), मा.मुख्य लेखापाल व मा.सल्लागार (कामगार) हे ४ अधिकारी अनुक्रमे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, खजिनदार व सचिव म्हणून पदसिध्द पदाधिकारी आहेत. याशिवाय वर्ग १ मधील १, वर्ग २ मधील १, वर्ग ३ मधील २ व वर्ग ४ मधील ३ आणि मान्यताप्राप्त कामगार संघटनेचा प्रतिनिधीची मिळून कार्यकारिणी बनली आहे.

प्रचलित कार्यकारिणी सदस्यांचा कार्यकाल पूर्ण झाल्याने नव्याने कार्यकारी समिती गठित करण्यात आली आहे. वरील ४ पदसिध्द पदाधिकारी आणि मान्यताप्राप्त कामगार संघटनेचा प्रतिनिधी वगळता पुढीलप्रमाणे सदस्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. वर्ग १ मधून मा. ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त (वि.का.क्र. २), वर्ग २ मधून डॉ. केतकी घाटगे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, धनकवडी क्षेत्रीय कार्यालय, वर्ग ३ मधून श्री. अरुण कामथे, पर्यवेक्षक, ढोलेपाटील प्राथमिक शाळा व श्रीमती संगिता सोनवणे, ज्यु.ग्रे.लेखनिक, मुख्य लेखापाल, वर्ग ४ मधून सर्वश्री कटके रामदास व सातपुते नंदकुमार, मोकादम, सहकारनगर व कसबापेठ क्षेत्रीय कार्यालय आणि श्री. नरसिंगे मधुकर, बिगारी, घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय यांची पुढील तीन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. नवनियुक्त सर्व कार्यकारिणी सदस्यांना कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.

**कल्याणवार्ता**
फेब्रुवारी, २००९
❖ प्रकाशक तथा अध्यक्ष ❖
कामगार कल्याण निधी
मा. प्रवीणसिंह परदेशी
आयुक्त, पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap
@punecorporation.org

## शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरक्षा योजना

शाळेतील अपघातग्रस्त विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबियांसाठी राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजना शासनाने सुरु केली आहे. याद्वारे कमाल मुलामुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा शासनाचा मानस आहे. ही योजना इयत्ता पहिली ते उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्वांसाठी आहे. योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हा विमा संबंधित विद्यार्थ्यांना २४ तास लागू रहाणार आहे.

दुर्दैवाने मृत्यू झाल्यास रु. ३०,०००, अपंगत्व आल्यास रु. ५०,००० वैद्यकीय खर्चासाठी रु. २,००० शस्त्रक्रियेसाठी रु. १०,००० इ.तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. याशिवाय अपघातामुळे पुस्तके हरविल्यास किंवा सायकल चोरीस गेल्यास भरपाईची तरतुद करण्यात आली आहे. ही योजना शालेय शिक्षण, उच्च तंत्र शिक्षण, आदिवासी व कृषी विभाग, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व वैद्यकीय शिक्षण या विभागांच्या अधिपत्याखालील सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांना लागू करण्यात आली आहे. योजनेचा लाभ मनपाच्या सर्व अधिकारी/सेवकांनी पालक या नात्याने घ्यावा, असे आवाहन कामगार कल्याण निधीतर्फे करण्यात येत आहे.

## जनजागृती अभियान प्रचार फेरी

संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत डहाणूकर कॉलनी वॉर्डमध्ये दिनांक ९/१/२००९ रोजी सकाळी १०.०० वाजता



ओला व सुका कचरा वर्गिकरण व स्वच्छता जनजागृती अभियान प्रचार फेरी काढण्यात आली. या मोहिमेंतर्गत लक्ष्मीनगर झोपडपट्टी डहाणूकर कॉलनी लगतच्या डोंगरमाथा परिसरामधील नागरिकांनी सहभाग घेवून प्लॅस्टिक पिशव्या, काच, कागद, कचरा, इत्यादी दोन कंटेनर भरुन काढण्यास मदत केली. नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा करा, ओला कचरा आपल्या सोसायटीमध्ये गांडूळ खत प्रकल्प राबवून जिरविण्यात यावा, स्वच्छता ठेवण्यासाठी महापालिकेस सहकार्य करा, प्लॅस्टिकचा वापर टाळा, सार्वजनिक ठिकाणी शौचास बसू नये, मोकळ्या जागेत कचरा टाकू नका, आपले आरोग्य धोक्यात आणू नका, आपल्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करा, स्वच्छ पुणे सुंदर पुणे हरित पुणे अशा ध्येयपूर्तीचे मनपातर्फे आवाहन करण्यात आले.

सदर मोहिमेमध्ये मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त, मा. सुरेश जगताप, उपायुक्त, मा. सुनिल गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी, वारजे कर्वेनगर, डॉ. संतोष मुळे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, कॉ. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन, लायन्स क्लब, पुणेचे प्रतिनिधी, विभागीय व आरोग्य निरीक्षक, सफाई कामगार, डहाणूकर कॉलनीतील जेष्ठ नागरिक व महिला व सरस्वती विद्या मंदीर माध्यमिक शाळेचे ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या प्रबोधनपर कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी मा. सुनिल गायकवाड यांचे नेतृत्वाखाली सर्वश्री दिपक ढेलवान, आरोग्य निरीक्षक, वैजनाथ गायकवाड, मोकादम व आण्णा ढावरे अशा सक्रीय सहकाऱ्यांच्या चमूने केले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी पुणे मनपा श्रमिक कला पथकाने गायनाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छता व कचऱ्याबाबत प्रबोधन व जागृती केली. प्रास्ताविक श्री. वैजूनाथ गायकवाड यांनी तर आभारप्रदर्शन श्री. दिपक ढेलवान यांनी केले.

## कचरा विभाजन मोहिमेचे आयोजन

दि.२०/१/०९ रोजी बिबवेवाडी, धनकवडी व हडपसर क्षेत्रीय कार्यालयांतर्फे पुणे मनपा कामगार युनियनच्या सहकार्याने कचरा विभाजन मोहिम बाबू गेनू शाळा, बिबवेवाडी येथे सुरु करण्यात आली. या प्रसंगी मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन यांनी सर्व मोकादमांना कचरा विभाजन मोहिमेच्या केंद्रस्थानी ठेवून आरोग्य कोठ्यांद्वारे प्रबोधनात्मक कार्यक्रम घेण्याविषयी सुचविले. खाजगी संस्थांपेक्षा मनपाचे कामगार अधिक यशस्वीपणे ही मोहिम राबवू शकतील, असे आश्वासनही त्यांनी दिले. मा. गावडे, क्षेत्रीय अधिकारी, घन कचरा व्यवस्थापन यांनी ओला व सुका कचरा वेगळा करण्याची अवघड जबाबदारी स्विकारण्याचे आवाहन सर्व मोकादमांना केले. मा. उमेश माळी, क्षेत्रीय अधिकारी, धनकवडी यांनी दैनंदिन कामकाजामध्ये घनकचरा व्यवस्थापनातील अडचणी व उपाययोजना सर्वांसमोर मांडल्या. त्यानंतर आरोग्य निरीक्षक व मोकादमांनी त्यांनी केलेल्या उपाययोजना, अभिनव उपक्रम व दैनंदिन अडचणींची माहिती दिली. मा.अनिल जगताप, क्षेत्रीय अधिकारी, बिबवेवाडी, डॉ. किशोर पाखरे, डॉ. कल्पना बळिवंत यांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमास मा. मुक्ता मनोहर, मा. उमेश माळी, मा. अनिल जगताप, श्री. गावडे, डॉ. अमृता इंगळे, डॉ. किशोर पाखरे, डॉ. कल्पना बळिवंत, डॉ. अमित शहा, डॉ. केतकी घाटगे, प्रमुख आरोग्य निरीक्षक व विभागीय कार्यालय क्र. ३ व ४ चे सर्व विभागीय आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, मोकादम व स्वच्छ संस्थेचे स्वयंसेवक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा सत्कार करुन त्यानंतर तिळगूळ वाटप व चहापानाचा कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ. अमृता इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. आवटी व आभार प्रदर्शन श्री. शेंडगे, प्रमुख आरोग्य निरीक्षक यांनी केले.

## अ‍ॅड. इधाटे उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी

यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी (यशदा) मध्ये टोटल क्वालिटी मॅनेजमेंट या विषयावर



आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये महापालिकेच्या अ‍ॅड मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर या सहभागी झाल्या होत्या. प्रशिक्षणांती प्रशिक्षणार्थींचे वेगवेगळे गट तयार करुन स्वतंत्र विषयावर सादरीकरण करणेबाबत प्रशिक्षणार्थींना सूचित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये अ‍ॅड. मंजुषा इधाटे यांनी सादर केलेल्या सादरीकरणास उत्कृष्ट प्रशिक्षणार्थी म्हणून गौरविण्यात आले. ही बाब अनुकरणीय व गौरवास्पद आहे.